# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १६/०७/२०२४

घरफोडीः-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. २३१/२४ कलम ३०५(अ), ३३१(१) भा. न्या. सं. | अमरावती | दि. १५/०७/२०२४ चे १२.३० वा. ते १४.१० वा. पोवेतो दि. १५/०७/२४ चे २२.०७ वा. | एक महिला | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ह्या मोठ्या मुलीसह घराला लॉक करुन आधारकार्ड अपडेट करण्यासाठी गेल्या होत्या घरी परत आल्या तेव्हा वॉलकंपाऊंडचे गेटला कुलूप लावले होते. घरातील मेन दरवाजाचा कोंडा तुटलेला दिसला फि. यांनी आत मध्ये जाऊन पाहनी केली असता वरच्या मजल्यावरील बेडरुमच्या कपाटातील ड्रावर मध्ये ठेवलेले १) सोन्याचे मंगळसुत्र ११ ग्रॅम कि.अं. ५०००/ रु. २) कानातले २ जोड ६ ग्रॅम कि.अं. ६०००/ रु असे एकुन १७ ग्रॅम एकुन किं. ११०००/ रु. चे दागिने व नगदी १७०००/ रु. असा एकुन २८,०००/ रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने दरवाजाचे कुलूप कोंडा तोडुन घरात प्रवेश करुन चोरुन नेला. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

स्त्रीअत्याचार :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटाा स्थळ | गु.घटाा ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो ाांव पत्ता | आरोपीचे ााव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. २३०/२४ कलम ४९८(अ), ५०४,३४ भादवी | अमरावती | दि. २१/०१/२०२४ चे १२.०० वा. ते दि. २४/०१/२४ १०.०० वा.<br><br>दि. १५/०७/२४ चे १९.५४ वा. | एक महिला | १) पिडीत महिलेचा नवरा व ०४ नातेवाईक सर्व रा. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे आरोपी क्र. १ सोबत दि. २१/०१/२४ रोजी रितीरिवाजाप्रमाणे लग्ण झाले. फि. च्या वडीलांनी शाक्षगंधा मध्ये ८.५ सोन्याची अंगठी व लग्णामध्ये १२ ग्रँम चा सोन्याचे गोफ दिला होता. फिर्यादी हि लग्णानंतर घरी नांदावयास गेल्यानंतर आरोपी क्र. १ याने म्हटेल की, मला लग्णात तुझ्या वडीलाने कार प्रेझेंट दिली नाही. मला ही मुलगी नको आहे. तिला तिच्या माहेरी पाठवुन दे तेव्हा आरोपी क्र. २ ते ४ यांनी फि. ला म्हटले की रिसेप्शनचा प्रोगाम झाल्यानंतर तुझ्या वडालांकडुन एक कार आन नाहीतर पुन्हा सासरी येवु नको. दि. २३/०१/२४ रोजी आरोपी क्र. १ ने फि. ला फोन करुन सांगीतले की माझे ऑफीसमधील एका बाई सोबत प्रेमसंबध आहे. माझे लग्ण करायचे मन नव्हते तसेच दि. २४/०१/२४ रोजी आरोपी क्र. १ हा फि. चे वडीलांचे घरी येवुन फि.ला म्हणाला की, तुझे वडीलांनी कार नाही दिली तर त्या बदल्यात ५ लाख रु. माग तसेच फि. चे आजोबा यांना म्हटले की ५ लाख देत असाल तर हिला घेऊन जातो असे म्हणुन शिवीगाळ केली. वरुन फि. चे वडीलांनी आरोपी क्र. २ ते ५ यांना घरी बोलावुन मिटीग घेतली असता सर्व आरोपी याने म्हटले की ५ लाख देत असाल तर मुलीला घेऊन जातो .माझा मुलगा अधिकारी आहे, तुमच्या घरात कोणी अधिकारी आहे का, असे म्हणुन शिवीगाळ केली .अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अमरावती. | अप. क्र. ६२७/२०२४ कलम १२(अ) महा. जु. का. | यशोदा नगर . १ , गल्ली नं. १, अमरावती. | दि.१५.७.२०२४ चे १६.३० वा. दरम्यान. | दि १५.०७.२०२४ चे २१.२५ वा. | सरतर्फे पो. हे.कॉं. योगेश सुंदरलाल श्रीवास, ब. नं. १०१५, पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर. | धर्मराज नामदेवराव पिलावन, वय ४० वर्ष, रा. मनकर्णा नगर, अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो. स्टाफ सह अवैध धंद्यावर रेड करणे बाबत आदेश मिळयावरुन पो.स्टे.हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायक माहितीवरुन दोन पंचा समक्ष आरोपीवर रेड केला असता त्याच्या ताब्यातुन नगदी १५६०/- रु. एक कागदी चिठ्ठी वरली मटका आकडे लिहीलेली व एक बॉंलपेन कि. अं ०५/- रु. असा एकुण १५६५/- रु. चा जुगार माल व साहित्य. मिळुन आल्याने त्याचे कृत्य कलम १२ (अ) महा.जु. का. प्रमाणे होते. अशा फिर्यादीच्या लेखी फिर्यादीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीशन :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोठाणे बडनेरा | अप क्र ४३९/२०२४ कलम ६५ई म.दा.का | बाळु दशरथ कांबळे याचे घराजवळ ग्राम हातुर्णा पुनर्वसन पोस्टे बडनेरा | दि १५/०७/२०२४ चे २०.०० वा पुर्वी | दि १५/०७/२०२ चे २२.२७ वा | पोका मेघश्याम नकाशे ब.न१६०९ पोस्टे बडनेरा | मनोज राजेश जाधव वय ३३वर्षे रा ग्राम हातुर्णा पुनवर्सन बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवानीळाला माल **Officers Choice BLUE** असे लेबल असलेले १८० एम एल चे च्या एकुन ०५ बॉटल कि अं. ७५० रु.२) **ROYAL STAG** असे लेबल असलेले १८० एम एल च्या ०५ बॉटल की ९०० रु .३) देशि दारु बॉबी संत्रा १८० एम .एल १० बॉटल प्रत्येकी ७० रु एकुन ७००रु,४) देशी दारु टॅंगो पंच असेलेबल असलेले १८० एम एलच्या १० बॉटल प्रत्येकी की७०रु एकुन ७०० रु असा एकुल ३०५०रु चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| २ | पोलीस स्टेशन राजापेठ मर्ग क्रं. ५७/२०२४ कलम १९४ भारतीय न्याय संहिता | ज्योती कॉलनी अमरावती घटना ता वेळ - दि १५/७/२४ चे ०४.१५ वा पुर्वी<br><br>दाखल ता वेळ दि १५/७/२४ चे १०.३३ वा | राजु सुखदेव लवंगे वय ४३ रा ज्योती कॉलनी अमरावती | सर तर्फे ASI निलेश वानखडे ब नं ८८० पोस्टे राजापेठ अमरावती श | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की पोस्टे राजापेठ येथे आम्ही ASI निलेश वानखडे ब नं ८८० पोस्टे राजापेठ अमरावती श असे दि १४/७/२४ चे २१.०० ते दि १५/७/२४ चे ०९.०० वा पावेतो तपास मदत डयुटी असतांना ईर्वीन पोलीस चौकी येथुन राजु सुखदेव लवंगे वय ४३ रा ज्योती कॉलनी अमरावती हे अतिदारु सेवन केल्याने मरण पावला आहे अशी माहीती प्राप्त झाल्यावरुन ईर्वीन दवाखाना येथे जावुन नमुद मयत चा मेमो क्र २३३१९ प्राप्त करण्यात आला नमुद मेमो मध्ये मयत हा दि १३/७/२४ रोजी १४.१५ वा दारु पिल्याने प्रक्रुती खराब झाली असल्याने उपचारा करीता भर्ती झाला होता तो दि १५/७/२४ चे सकाळी ०४.१५ पर दरम्यान वार्ड क्र १३ मध्ये उपचारा दरम्यान मरण पावला असुन त्याचे प्रेत पि एम करीता मर्च्युरी येथे ठेवण्यात आला आहे असे नमुद असुन प्राप्त मेमो वरुन डी ओ आदेशाने सदरचा मर्ग दाखल |
| ३ | पोलीस स्टेशन राजापेठ मर्ग क्रं. | राहते घरि , रेल्वे स्टेशन, शिवाजी मराठा शाळेजवळअमर | विशाल सुरेशराव चव्हान वय ३५ वर्ष रा. रेल्वे स्टेशन, शिवाजी | सर तर्फे HC विनोद माहुरे ब नं ३९३ पोस्टे राजापेठ अमरावती श | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की फिर्यादी अतुल सुरेशराव चव्हान वय ३० वर्ष रा. रेल्वे स्टेशन, शिवाजी मराठा शाळेजवळअमरावती यांनी पो. स्टे. ला ॅयेवुन जबाणी रिपोर्ट दिला की ते वर नमुद पत्त्यावर त्यांची आई, पत्नी, लहान मुलगी व मृतक यांचेसह राहतात व तापडिया मॉल येथे जॉब करतात यातील मृतक हा त्यांचा लहान भाऊ असुन तो काहीही कामधंदा करित नाही तसेच त्याला दारी पिण्याचे व्यसन आहे. नमुद घटना ता. वेळी व छिकाणी ते कामावर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ५८/२०२४ कलम १९४ भारतीय न्याय संहिता | ावती<br><br>घटना ता वेळ - दि १५/७/२४ चे २०.१५ वा पुर्वी<br><br>दाखल ता वेळ दि १५/७/२४ चे २२.२२ वा | मराठा शाळेजवळअमराव ाती | | गेले असता त्यांची आई कामावर गेली होती पत्नी शेजारी गेली असतांना घरि कोणीही हजर नसतांना यातील मृतक याने राहते घरि गळफास घेतल्याचे पोनव्दारे फिर्यादी यांना कामाचे ठिकाणी माहिती पडले नंतर ते घरि आले घटनेची माहिती पो. स्टे. ला येवुन दिली अशा रिपोर्ट वरून व डि. यो. यांचे आदेशाने सदरचा मर्ग दाखल |